# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## देवमाता मरिया सण - ०१ जानेवारी २०२१

## सांयप्रार्थना

*महत्वाची सूचना ः खिस्तसभेची प्रार्थना किंवा ब्रिविअरी प्रार्थना हा प्रकार खूप प्राचीन आहे. मठवासी धर्मगुरूंकडून आलेली ही प्रार्थना चर्च आपली अधिकृत प्रार्थना म्हणून मानते. सदर प्रार्थनेचं एक महत्वाचं वैशिष्टय म्हणजे ही संपूर्ण प्रार्थना बायबलवर आधारीत आहे. धर्मगुरू धर्मभगिनी तसेच अनेक प्रांपचिक ही प्रार्थना नित्यनेमाने करीत असतात. आपल्या संपूर्ण कुटुंबाला एकत्रित करून आपण ही प्रार्थना करावी. चिंतन व गरजेनुसार विनंत्या ह्या प्रार्थनेमध्ये अंतर्भूत करता येतील. खिस्त सभेची ही महत्वाची प्रार्थना करण्यापूर्वी घरात प्रार्थनामय वातावरण तयार करा. टिव्ही मोबाईल बंद करा घरातल्या राजपिठासमोर मेणबत्त्या लावा प्रार्थनेला योग्य असे कपडे करा व आपल्या कुटुंबासाठी हा एक भक्तीमय सोहळा बनवा. खिस्तसभेची ही महत्वाची प्रार्थना आपणांस सतत प्रेरणा देत राहो.*

**चरण:** हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

**प्रतिसाद:** हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**गीत ः** नाताळ गीत

**प्रतिगीत १:** काय ही अद्‌भुत अदलाबदल! मानवाच्या निर्माणकर्त्याने मानवी देह धारण केला आणि तो कुमारीपासून जन्मला. मानवी पित्याविना तो मानव झाला आणि त्याने आम्हाला त्याच्या ईश्वरी स्वभावाने वाटेकरी केले.

**स्तोत्र १२२**

आपण परमेश्वराच्या घराकडे जाऊ असे ते मला म्हणाले,
तेव्हा मला आनंद झाला.

हे येरूशलेमे, तुझ्या वेशींना आमचे पाय लागले आहेत.

**हे** येरूशलेमे, एकत्र जोडिलेल्या नगरीसारखी तू बांधिलेली आहेस.
इस्त्राएलास लावून दिलेल्या निर्बंधाप्रमाणे
तुझ्याकडे वंश-परमेशाचे वंश -
परमेश्वराच्या नावाचे उपकारस्मरण करण्यासाठी चढून येतात,

**कार**ण तेथे न्यायासने,
दावीदाच्या घरण्याची राजासने मांडिली आहेत.

**ये**रूशलेमेच्या शांतीसाठी प्रार्थना करा.
तुझ्यावर प्रीती करणाऱ्याचे कल्याण असो.
तुझ्या कोटात शांती वसो;
तुझ्या राजवाडयात समृद्धी नांदो.

**मा**झे बंधू व माझे मित्र ह्यांच्याकरिता
तुझ्यामध्ये शांती वसो अशी प्रार्थना करीन,
परमेश्वर आमचा देव ह्याच्या घराकरिता
तुझ्या कल्याणासाठी मी झटत जाईन.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: काय ही अद्भुत अदलाबदल! मानवाच्या निर्माणकर्त्याने मानवी देह धारण केला आणि तो कुमारीपासून जन्मला. मानवी पित्याविना तो मानव झाला आणि त्याने आम्हाला त्याच्या ईश्वरी स्वभावाने वाटेकरी केले.

******

प्रतिगीत २: तो कुमारीपासून रहस्यमयरित्या जन्मला ते कोणीही शब्दांत सांगू शकत नाही. त्याने शास्त्र पूर्ण केले. पाऊस जसा धरतीवर अलगदपणे पडतो तसा तो मानवजातीचे तारण करण्यासाठी हळूच या पृथ्वीवर अवतरला. आम्ही तुझे स्तवन करतो कारण तू आमचा देव आहेस.

स्तोत्र १२७

**प**रमेश्वर जर घर बांधीत नाही
तर ते बांधणाऱ्याचे श्रम व्यर्थ आहेत;
परमेश्वर जर नगर रक्षीत नाही
तर पहारेकऱ्याचे जागरण व्यर्थ आहे.

**तु**म्ही पहाटे उठता, उशिरा विश्रांती घेता
व कष्टाचे अन्न खाता,
पण हे व्यर्थ आहे;
तोच आपल्या प्रियजनांस लागेल ते झोपेतही देतो.

**पा**हा, संतती ही परमेश्वराने दिलेले धन आहे;
पोटचे फळ त्याची देणगी आहे.
तरूणपणचे मुलगे हे वीराच्या हातातील बाणाप्रमाणे आहेत.

**ज्या** पुरूषाचा भाता अशांनी भरला आहे तो धन्य!
वेशीवर शत्रूंशी त्याची बोलाचाली होत असता
तो फजीत होणार नाहीत.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत २:** तो कुमारीपासून रहस्यमयरित्या जन्मला ते कोणीही शब्दांत सांगू शकत नाही. त्याने शास्त्र पूर्ण केले. पाऊस जसा धरतीवर अलगदपणे पडतो तसा तो मानवजातीचे तारण करण्यासाठी हळूच या पृथ्वीवर अवतरला. आम्ही तुझे स्तवन करतो कारण तू आमचा देव आहेस.

*******

**प्रतिगीत ३:** मोशेने झुडूप पाहिले तो ते जळत होते परंतु भस्मसात होत नव्हते. त्यात आम्ही तुझे कौमार्य पाहतो. आम्ही त्याचा सन्मान करतो. हे देवाचे माते, आम्हासाठी विनंती कर.

**काव्य - इफिस १:३ - १०**

**आ**पल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे;

**त्या**प्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले;

**त्या**ने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वत:चे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच नेमिले होते. त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे.

**त्या**च्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी त्याच्या रक्ताच्याद्वारे खंडणी भरून मिळविलेली मुक्ती म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा आपल्याला मिळाली आहे,

**स**र्व ज्ञान व बुद्धी ह्यांच्यासह त्याने ही कृपा आपल्यावर विपुलतेने केली आहे; ख्रिस्ताच्या ठायी पूर्वी केलेल्या योजनेप्रमाणे त्याने स्वत:च्या इच्छेनुरूप स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळविले;

**ती** योजना अशी की, कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना स्वर्गात व पृथ्वीवर जे आहे ते सर्व ख्रिस्तामध्ये एकत्र करावे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** मोशेने झुडूप पाहिले तो ते जळत होते परंतु भस्मसात होत नव्हते. त्यात आम्ही तुझे कौमार्य पाहतो. आम्ही त्याचा सन्मान करतो. हे देवाचे माते, आम्हासाठी विनंती कर.

**शास्त्रवाचन** गलती ४: ४ - ५

काळाची पूर्णता झाली तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठविले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन असा जन्मलेला होता. ह्यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांस त्याने खंडणी भरून सोडवावे, आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: शब्द देह झाला, आल्लेलुया, आल्लेलुया.
प्रतिसाद: शब्द देह झाला, आल्लेलुया, आल्लेलुया.
चरण: आणि त्याने आम्हामध्ये वसती केली
प्रतिसाद: शब्द देह झाला, आल्लेलुया, आल्लेलुया.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: शब्द देह झाला, आल्लेलुया, आल्लेलुया.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** हे ख्रिस्ता, ज्या उदराने तुझा भार वाहिला आणि जी स्तने तू चोखलीस ती धन्य. तू आमचा प्रभू आणि जगाचा तारणारा आहेस, आल्लेलुया.

**मरियेचे स्तोत्र:** लूक १:४६-५५

'माझा जीव प्रभूला' थोर मानितो
आणि 'देव जो माझा तारणारा'
त्याच्यामुळे माझा आत्मा 'उल्हासला आहे;'

कारण 'त्याने' आपल्या 'दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.'
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

कारण जो समर्थ आहे,
त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि 'त्याचे नांव पवित्र आहे,'
आणि जे 'त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्‌पिढया आहे.'

त्याने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने 'गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.'

'त्याने अधिपतींस' राजसनांवरून 'ओढून काढिले आहे,'
'त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,'
व 'धनवानांस रिकामे लावून दिले आहे.'

आपल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

पिता पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत :** हे ख्रिस्ता, ज्या उदराने तुझा भार वाहिला आणि जी स्तने तू चोखलीस ती धन्य. तू आमचा प्रभू आणि जगाचा तारणारा आहेस, आल्लेलुया.

## विनंत्या

प्रतिसाद: कुमारी मरियेच्या पुत्रा, आमची प्रार्थना ऐक.

इम्मानुएल ख्रिस्त धन्यवादित असो! कुमारिकेने त्याला जन्म दिला आणि तो या जगात अवतरला. प्रतिसाद: कुमारी मरियेच्या पुत्रा, आमची प्रार्थना ऐक.

तू कुमारी मरियेला मातृत्वाचा आनंद दिलास - सर्व पालकांना त्यांच्या मुलांकडून आनंद लाभू दे. प्रतिसाद: कुमारी मरियेच्या पुत्रा, आमची प्रार्थना ऐक.

**हे** शांतीच्या राजा, तुझे राज्य न्यायनीतीचे आणि शांतीचे आहे - सर्व लोकांना एकत्र आणणाऱ्या गोष्टींचा आम्ही ध्यास धरावा असे कर. प्रतिसाद: कुमारी मरियेच्या पुत्रा, आमची प्रार्थना ऐक.

**सं**पूर्ण मानवजातीला एक पवित्र प्रजा म्हणून घडविण्यास तू आलास - सर्व राष्ट्रांना ऐक्य भावनेने एकत्र कर. प्रतिसाद: कुमारी मरियेच्या पुत्रा, आमची प्रार्थना ऐक.

**तू** एका मानवी कुटुंबात जन्म घेतलास - आमचे कौटुंबिक जीवन प्रेमाच्या धाग्याने भक्कम कर. प्रतिसाद: कुमारी मरियेच्या पुत्रा, आमची प्रार्थना ऐक.

**तू** आमच्या दुर्बळ मानवी जगात प्रवेश केलास - आमच्या मृतांना तुझ्या राज्यातील गौरवशाली जीवनात सहभागी कर. प्रतिसाद: कुमारी मरियेच्या पुत्रा, आमची प्रार्थना ऐक.

**आ**मच्या स्वर्गीय बापा ...

## समारोपाची प्रार्थना

हे आमच्या परमेश्वर बापा, आमची माता धन्य कुमारी मरिया, हिच्याद्वारे तू मानवजातीला तारणारा दिलास. तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त, ह्याच्यासह जेव्हा ती आमच्यासाठी प्रार्थना करते तेव्हा आम्हाला तिच्या मध्यस्थीच्या सामर्थ्याचा अनुभव येऊ दे. तो जीवनाचा स्वामी आहे. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.

(धर्मप्रांतीय उपासना आयोग फा. रॉबर्ट डिसोजा हयांच्या अथक परिश्रमाबद्दल तसेच सहाय्य करणा-या सर्वांचा ऋणी आहे.)